# द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.

पत्ता :- ८१९-अ,भवानी पेठ,पुणे:-४११ ०४२.

नोंदणी क्र.:-बी-३०५६,दिनांक:-१४-११-१९६०.

---

दिनांक:-१९/०५/२०२२

## पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे की, संस्थेची पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १३/०५/२०२३ रोजी ठिक सायंकाळी ०६.०० वाजता वायएमसीए हॉल पहिल्या मजल्यावर आयोजित करण्यात आली होती. सभेस संस्थेचे सचिव यांनी श्री.विजय ओसवाल, आर्किटेक्ट चैतन्य पेशवे आणि उपस्थित सभासदांचे स्वागत करून सभेस सुरुवात केली.

**विषय क्रमांक ०१ :-** संस्थेचा फिजीबिलीटी रिपोर्ट सर्व सभासदांसमोर सादर करणे.

**ठराव क्रमांक ०१ :-** संस्थेचे आर्किटेक्ट चैतन्य पेशवे यांनी सभासदांना Feasibility Report हा Summary स्वरूपात समजुन सांगितला. ज्यावेळी एखादा विकसक आपला प्रोजेक्ट करायला येईल त्यावेळी येणारा बांधकामाचा खर्च, FSI Purchase Cost, Interest Cost, Development Cost हे सर्व खर्च असतात हे करताना जे Existing Member आहे त्यांच्यासाठी Relocation Cost, Stamp Duty Cost, GST Cost, Bank Guarantee हे सर्व करताना विकसक हा त्याला त्यातुन मिळणारा Profit कसा मिळेल म्हणजेच ज्यावेळी विकसक १०० रूपये लावत आहे तर मला त्यातुन १२५ रूपये मिळावे अशी अपेक्षा विकसकाची असते थोडक्यात त्या विकसकाला Free

Sale Component किती मिळेल आणि उरलेला जो Balance Area आहे. तो एरिया Part Of Redevelopment Proceeds म्हणजेच Percent मध्ये किती देऊ शकतो हे सर्व या Feasibility समजुन सांगितले. पण दरम्यानच्या काळात शासनाने नविन डेव्हलपमेंट बाबतीतील काही नियमावली लागु करण्यात आली आहे म्हणजेच (U-DCPR) यासंदर्भातील फायदे आणि आपल्या प्लॉटच्या समोर जो संलग्न रोड आहे त्याबाबत असलेले प्रश्न अशा अनेक प्रश्नांची उत्तरे संस्थेचे आर्किटेक्ट श्वेता चौधरी यांनी समाधानकारक दिली.

फिजीबिलीटी रिपोर्ट हा सर्व सभासदांना समजावुन सांगितल्यावर सभासदांच्या म्हणण्यानुसार पुढची स्टेप ही टेंडर प्रोसेस चालु करावी आणि विकसक कशा पध्दतीने प्लॉटचा अभ्यास करून ऑफर देतील तशा घेण्यात याव्यात असे ठरले. नेमकी टेंडर प्रोसेस बाबत प्रकल्प सल्लागार श्री.विजय ओसवाल यांची नेमकी काय जबाबदारी असेल हे सभासदांना समजावुन सांगितले. संस्थेला प्रथम टेंडर फॉर्म आणि स्पेसिफीकेशन लिस्ट पाठवावी असे ठरले म्हणजे त्यात जर काही पॉईंट ॲड करायचे असतील तर तसे सभासदांनी कळवावे.

त्यानंतर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेचे प्रकल्प सल्लागार आणि आर्किटेक्ट यांचे सभासदांच्या वतीने आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

सुचक :-श्री. जय शर्मा

अनुमोदक :-श्री. रमेश गोधवानी

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था वतीने,

Co-op. Housing Society Ltd. Regd. No. B-J.056 14-11-1960

Madhu L. Sharma

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|